**विकास योजना - कळमनुरी [मूळ हद्द (दुसरी सुधारित) + वाढीव हद्द (सुधारित)] जि.हिंगोली**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये भागशः मंजूरीबाबत अधिसूचना...

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०० ०३२.

**शासन निर्णय क्र.टिपीएस-३१२३/९१४/प्र.क्र.१३०/२०२३/वि.यो.मंजूरी (भागशः)/नवि-३०**

**दिनांक : ०३.०७.२०२५**

**शासन निर्णय** :- सोबतची अधिसूचना महाराष्ट्र शासन साधारण राजपत्राच्या छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणीमध्ये प्रसिद्ध करण्यात यावी.

***महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,***

(प्रसाद रा. शिंदे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३) मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.उप मुख्यमंत्री महोदय (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.उप मुख्यमंत्री महोदय (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.राज्यमंत्री महोदय (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, यांचे सचिव महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, यांचे सचिव महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
९) मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद / विधानसभा, यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
१०) अपर मुख्य सचिव (नवि-१),नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) संचालक, नगर रचना तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रति,**

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे.
२) विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.

३) विभागीय सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
४) जिल्हाधिकारी, हिंगोली.
५) सहायक संचालक, नगर रचना, हिंगोली शाखा, हिंगोली.

(त्यांना कळविण्यात येते की, सोबतच्या अधिसूचनेच्या अनुषंगाने अधिप्रमाणित करण्यात यावयाच्या विकास योजनेच्या नकाशाच्या पाच प्रती शासनास विहीत मार्गाने सादर करण्यात याव्यात.)

६) मुख्याधिकारी, कळमनुरी नगरपरिषद, जि. हिंगोली.
७) व्यवस्थापक, शासकिय मुद्रणालय, छत्रपती संभाजीनगर.

/- त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्राच्या भाग-१ छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर पुरवणी भाग १ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी ५ प्रती या विभागास, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर, सहायक संचालक, नगर रचना, हिंगोली शाखा, हिंगोली व मुख्याधिकारी, कळमनुरी नगर परिषद, जि.हिंगोली यांना पाठवाव्यात.

८) निवडनस्ती (नवि-३०).

********

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक : ०३.०७.२०२५**

## अधिसूचना

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना, अधिनियम १९६६*

**क्र.टिपीएस-३१२३/९१४/प्र.क्र.१३०/२०२३/वि.यो.मंजूरी(भागशः)/नवि-३०:** ज्याअर्थी, कळमनुरी नगरपरिषद, जि.हिंगोली (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असा उल्लेख करणेत आलेला आहे.) या नियोजन प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असा उल्लेख करणेत आलेला आहे.) चे कलम २३*(१)* सह कलम ३८*(१)* अन्वयेच्या तरतूदीनुसार ठराव क्र.३१७, दि.०५.०२.२०२१ अन्वये, प्रारुप विकास योजना [मूळ हद्द (दुसरी सुधारित) + वाढीव हद्द (सुधारित)] (यापुढे "उक्त प्रारुप विकास योजना" असे संबोधिलेले आहे) तयार करणेचा इरादा जाहीर केला असून त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी, पृष्ठ क्र.५४ ते ५५, दि.१५.०४.२०२१ ते दि.२१.०४.२०२१ अन्वये प्रसिध्द झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाच्या कलम २५ अन्वये तिच्या हद्दीतील जमिनीचे सर्वेक्षण करुन, उक्त प्रारुप विकास योजना तयार करुन उक्त अधिनियमाच्या कलम २६*(१)* अन्वये प्रसिध्द करण्यास ठराव क्र.१८, दि.११.११.२०२१ अन्वये मान्यता दिली असून त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-१अ, छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी, दि.१७.११.२०२२ ते दि.२३.११.२०२२ पृष्ठ क्र. ८२ सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रसिध्द प्रारुप विकास योजनेवर विहित मुदतीत आलेल्या हरकती व सूचनांचा विचार करुन उक्त अधिनियमाच्या कलम २८*(२)* नुसार स्थापन केलेल्या नियोजन समितीने तिचा अहवाल उक्त नियोजन प्राधिकरणाकडे सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने नियोजन समितीचा अहवाल विचारात घेऊन उक्त अधिनियमाच्या कलम २८*(४)* अन्वये उक्त प्रारुप विकास योजनेत काही बदल करुन, ठराव क्र.३१, दि.१३.०३.२०२३ अन्वयेच्या ठरावानुसार असे बदल प्रसिध्द करण्याचे ठरवून, या बदलांसह (यापुढे "उक्त फेरबदल" असे संबोधिलेले आहे) प्रारुप विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम २८*(४)* अन्वये जनतेच्या

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - 32.

अवलोकनार्थ प्रसिध्द केली असून, त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणीमध्ये पृष्ठ क्र.२० ते २१, दि.२१.०३.२०२३ रोजी प्रसिध्द झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील कलम ३० मधील उपकलम *(१)* मधील तरतूदीनुसार उक्त नियोजन प्राधिकरण यांनी उक्त विकास योजना उक्त फेरबदलांसह शासनास पत्र क्र. ५००, दि. २१.०३.२०२३ अन्वये सादर केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१*(१)* मधील तरतूदीनुसार उक्त विकास योजनेबाबत आवश्यक त्या चौकशीनंतर तसेच संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्ला मसलत केल्यानंतर उक्त विकास योजना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ (एस.एम.-१) मधील बदलासह, सूचना क्र.टिपीएस-३१२३/९१४/प्र.क्र.१३०/२०२३/ई.पी.प्रसिध्दी/नवि-३०, दि.०३.०७.२०२५ सोबतच्या परिशिष्ट-ब मधील (ई.पी.-१ ते ई.पी.-७) सारभूत बदल, वगळून भागशः मंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अध्यादेश, २०२४ चे कलम ३ नुसार मुळ अधिनियमाच्या कलम ३१ चे उपकलम *(१) (दोन)* मधील सुधारित परंतुकानुसारच्या तरतुदीनुसारच्या कालावधीत, उक्त प्रारुप विकास योजना शासनाने मंजूर करणे आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१*(१)* मधील तरतूदीनुसार तसेच इतर अनुषंगिक शक्तींचा वापर करुन शासन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे:-

१. अ) कळमनुरी नगरपरिषदेच्या प्रारुप विकास योजनेस सोबतच्या परिशिष्ट-अ मधील बदलासह, सूचना क्र.टिपीएस-३१२३/९१४/प्र.क्र.१३०/२०२३/ई.पी.प्रसिध्दी/नवि-३०, दि.०३.०७.२०२५ सोबतच्या परिशिष्ट-व मधील (ई.पी.-१ ते ई.पी. ७) सारभूत बदल वगळून, मंजूरी देण्यात येत आहे,

ब) उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) नुसार उक्त विकास योजनेच्या मंजूरीसाठी दि.०३.०७.२०२५ हा दिवस धरुन मुदतवाढ मंजूर करणेत येत आहे.

क) कळमनुरी नगरपरिषदेची उक्त भागशः मंजूर विकास योजना सदर अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसानंतर अंमलात येईल.

**टिप:-**

१. जी आरक्षणे / नामाभिधान सोबतच्या "परिशिष्ट-अ" मध्ये व सूचना क्र.टिपीएस-३१२३/९१४/प्र.क्र.१३०/२०२३/ई.पी.प्रसिध्दी/२०२०/नवि-३०, दि.०३.०७.२०२५ सोबतच्या

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
सत्यमेव जयते

"परिशिष्ट- ब" मध्ये नमूद नाहीत, अशी आरक्षणे त्या-त्या प्रयोजनासाठो उक्त विकास योजनेत दर्शविण्यात आल्यानुसार मंजूर करणेत येत आहे.

२. शासन अधिसुचना, नगर विकास विभाग क्र.टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/कलम-३७*(१कक)(ग)* व कलम २०*(४)*/नवि-१३, दि.०२.१२.२०२० अन्वये मंजूर केलेली एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, त्यानंतर वेळोवेळीच्या बदलांसह कळमनुरी नगरपरिषद, जि.हिंगोली क्षेत्राकरिता लागू राहील.

३. विकास योजनेत दर्शविलेल्या रस्त्यांच्या कोपरा गोलाईकरीता (Corner Rounding) एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्र.३.३.१२ लागू राहतील.

४. विकास योजनेमध्ये वर्गीकृत रस्त्याची रुंदी ही प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्र.३.३.८ बाबत शासनाचे नगर विकास विभागाकडील दि.२३.१२.२०२१ रोजीच्या स्पष्टीकरणानुसार ठेवणे आवश्यक राहील.

५. ज्या जमिनी मंजूर व अंमलात असलेल्या विकास योजनेनुसार औद्योगिक विभागात दर्शविल्या आहेत तसेच ज्या जमिनीवर विद्यमान औद्योगिक वापर अस्तित्वात आहे अथवा पूर्वी अस्तित्वात असून सद्यस्थितीत बंद झालेला आहे; अशा जमिनी, प्रस्तुतच्या विकास योजनेत जरी विविध विभागात निर्देशित केल्या असतील तरीही, त्या जमिनींमधील विकास परवानगी प्रकरणी UDCPR मधील विनियम क्र.४.८.१ चे तरतूदीनुसार नियोजन प्राधिकरणास निर्णय घेणे बंधनकारक राहील.

उपरोक्त भागश: मंजूर अंतिम विकास योजना - कळमनुरी, जनतेच्या अवलोकनार्थ मुख्याधिकारी, कळमनुरी नगरपरिषद, जि.हिंगोली यांच्या कार्यालयात, सदर विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून एक महिन्यापर्यंत उपलब्ध करणेत येत आहे.

सदरची अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे www.maharashtra.gov.in (कायदे/नियम) या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

***महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे नावाने व आदेशाने,***

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-32. सत्यमेव जयते

(प्रसाद रा. शिंदे)

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

# परिशिष्ट-अ

विकास योजना – कळमनुरी नगरपरिषद, जि.हिंगोली (मूळ हद्द (दुसरी सुधारित) + वाढीव हद्द (सुधारित))

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१*(१)* अन्वये शासनाने मंजूर केलेले फेरबदल.

(शासन अधिसूचना क्र. टिपीएस-३१२३/९१४/प्र.क्र.१३०/२०२३/वि.यो.मंजूरी(भागशः)/नवि-३०, दि.०३.०७.२०२५ चे सहपत्र)

| अनु.क्र. | बदल | स्थान | आरक्षण क्र. | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ नुसार प्रसिध्द विकास योजनेनुसारचा प्रस्ताव | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३० नुसार शासनास मंजूरीसाठी सादर विकास योजनेनुसारचा प्रस्ताव | शासनाने, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) नुसार मंजूर केलेला फेरबदल |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| 1 | SM-1 | -- | Site no. 8, 17, 20 | Site No.8, 17, 20 – “Multipurpose Play Ground” | Site No.8, 17, 20 – “Multipurpose Play Ground” | Site No.8, 17, 20 – “Multipurpose Play Ground” are re-designated as ‘Multipurpose Ground” |

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशाने व नावाने,*

(प्रसाद रा.शिंदे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT**

4th FLOOR, MANTRALAYA,

MADAM KAMA MARG, HUTATMA RAJGURU CHOWK.

MUMBAI 400 032.

**DATED : 03.07.2025**

## NOTIFICATION

***The Maharashtra Regional & Town Planning Act, 1966***

**No.TPS-3123/914/CR-130/2023/DP Sanction (Part)/UD-30:** Whereas, the Kalamnuri Municipal Council, Dist. Hingoli, being the Planning Authority (hereinafter referred to as "the said Planning Authority") *vide* its Resolution No.317, dated the 05.02.2021, declared its intention under section 23*(1)*, read with section 38*(1)* of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act"), to prepare the Draft Development Plan [Original limits (Second Revised) + Extended Limits (Revised)] (hereinafter referred to as "the said Draft Development Plan") and notice such declaration was published at Page No.54 to 55 in the *Official Gazette*, Chhatrapati Sambhajinagar Division Supplement dated the 15.04.2021 to 21.04.2021;

And whereas, the said Planning Authority after carrying out surveys of its Area as required under Section 25 of the said Act, decided to publish a Draft Development Plan under section 26*(1)* of the said Act, *vide* its Resolution No.18, dated the 11.11.2021 and notice to that effect is published in the *Official Gazette*, Chhatrapati Sambhajinagar Divisional Supplement dated the 17.11.2022 to 23.11.2022, for inviting suggestions and / or objections;

And whereas, after considering the suggestions and objections to the said Draft Development Plan received within stipulated period, the Planning Committee appointed under section 28*(2)* of the said Act, has submitted its report to the said Planning Authority;

And whereas, after considering the report of Planning Committee, the Planning Authority vide its Resolution No.31, dated the 13.03.2023, had decided to make some modifications and to publish such modifications in the said Draft Development Plan (hereinafter referred to as "the said Modifications"), which were published in the *Official Gazette,* Chhatrapati Sambhajinagar Divisional Supplement page no. 20-21 dated the 21.03.2023 under Section 28*(4)* of the said Act;

And whereas, in accordance with the provision of sub-section *(1)* of Section 30 of the said Act, the said Planning Authority has submitted the said Draft Development Plan, along with the said Modifications to the Government for sanction *vide* its Marathi letter No.500 dated the 21.03.2023;

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-32. सत्यमेव जयते

And whereas, in accordance with sub-section *(1)* of Section 31 of the said Act, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the State Government is of the opinion that the said Draft Development Plan should be sanctioned partly, excluding the substantial Modifications (as EP-1 to EP-7) as specified in SCHEDULE-B appended to Notice No.TPS-3123/914/CR-130/2023/EP Publish/UD-30, dated the 03.07.2025;

And whereas, within the period provided for in the amended proviso to sub-section *(1)* (two) of section 31 of the principal Act under section 3 of the Maharashtra Regional Planning and Town Planning (Amendment) Ordinance, 2024, the said draft development plan is to be approved by the Government;

Now therefore, in exercise of the powers conferred by section 31*(1)* of the said Act and of all other powers enabling it on that behalf, the Government of Maharashtra hereby:-

01. A) Accords Sanction the said Draft Development Plan of the Area within Kalamnuri Municipal Council, Dist. Hingoli, as specified in SCHEDULE-A (as SM-1) appended hereto, excluding the substantial Modifications (as EP-1 to EP-7) as specified in SCHEDULE-B appended to Notice No.TPS-3123/914/CR-130/2023/EP Publish/UD-30, dated the 03.07.2025.

B) Extends the period prescribed under amended proviso to sub-section (1) (two) of section 31 of the principal Act under section 3 of the Maharashtra Regional Planning and Town Planning (Amendment) Ordinance, 2024, for sanctioning the said Draft Development Plan up to and inclusive of dt. 03.07.2025.

C) The said Sanctioned Development Plan called the Final Development Plan of the Area within Kalamnuri Municipal Council, Dist. Hingoli, shall come into force, after 30 days from the publication of this Notification in the *official Gazette*.

**Note:-**

1) The reservations / allocations / designations which do not appear in the Schedule-A appended to this Notification and **Schedule-B** appended to Notice No.TPS-3123/914/CR-130/2023/EP Publish/UDCO-30, dated the 03.07.2025, are hereby sanctioned for the respective purpose as designated in the Development Plan.

2) The Unified Development Control and Promotion Regulation sanctioned *vide* Notification No.TPS-1818/CR-236/18/Section 37*(1AA)(c)* and Section 20(4)/UD-13, dated the 02.12.2020, as amended from time to time, shall be applicable to the said Area of the Kalamnuri Municipal Council, Dist. Hingoli.

3) The width of the roads classified in the Development Plan will have to be kept as per clarification issued by the Government in Urban Development Deparment, dated the 23.12.2021 regarding Regulation No.3.3.8 of the Unified Development Control and Promotion Regulation.

4) At the junction of roads where corner rounding is not indicated in the sadi Draft Revised Development Plan, the rounding should be considered as per the Provision of Regulation No.3.3.12 of the Unified Development Control and Promotion Regulation in accordance with the width of the road.

5) The lands shown in the industrial zone according to the sanctioned and implemented development plan, as well as the lands where existing industrial use is currently present or was present earlier but is now closed, even if such lands are designated under various zones in the current development plan, the planning authority shall be bound to decide on development permissions for such lands in accordance with the provisions of Regulation No. 4.8.1 of the UDCPR.

The aforesaid final Development Plan of the Kalamnuri Municipal Council, Dist. Hingoli partly sanctioned by the State Government *vide* this Notification shall be kept open for inspection by the general public during office hours on all working days for a period on **one month** from the date of coming into force of this Development Plan, in the office of the Chief Officer, Kalamnuri Municipal Council, Dist. Hingoli.

This Notification is available on the Government of Maharashtra website www.maharashtra.gov.in (Acts/Rules)

***By order and in the name of the Governor of Maharashtra,***

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

(Prasad R.Shinde)
**Under Secretary to Government**

## SCHEDULE-A

**Development Plan – Kalamnuri Municipal Council, Dist.Hingoli (Original limit (Second Revised) + Additional Area (Revised))**

**Modifications Sanctioned by the Government under section.31*(1)* of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966**

**(Accompaniment to the Government Notification No.TPS-3123/914/CR-130/2023/D.P. Sanction(Part)/UD-30, Dt. 03.07.2025)**

| Sr. No. | Modification | Location | Site No. | Proposal as per Development Plan published under section 26 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. | Proposal as per Development Plan submitted to State Government for sanction under section 30 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. | Proposal as sanctioned by the Government under section 31 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | 7 |
| 1 | SM-1 | -- | Site no.8, 17, 20 | Site No.8, 17, 20 – "Multipurpose Play Ground" | Site No.8, 17, 20 – "Multipurpose Play Ground" | Site No.8, 17, 20 – "Multipurpose Play Ground" are re-designated as 'Multipurpose Ground" |

*By Order and in the name of the Governor of Maharashtra,*

(Prasad R.Shinde)
**Under Secretary to Government**